ePaper

# महाराष्ट्रात ऑपरेशन लोटस सुरुय, पृथ्वीराज चव्हाण




| वर्ष - 6 | अंक - 358 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार दि. 18 एप्रिल 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## आतील पानांत


- अजित पवारांची फक्त चर्चाच
- राष्ट्रवादीतील संभाव्य फुटीने भाजपा-शिंदे गटात अस्वस्थता
- चौथी पास राजा भ्रष्टाचारी!




# अवकाळी झडप!

## » वादळी वाऱ्यामुळे होर्डिंग कोसळले : 5 निष्पाप जीवांचा अंत, तीन जखमी

**।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पुणे- मुंबई हायवे लगत असलेली एक मोठी होर्डिंग वादळी वाऱ्यामुळे कोसळली आहे. या घटनेत पाच जणांचा मृत्यू तर तीन जण जखमी झाले आहेत. ही घटना किवळे (रावेत) येथे सहाच्या सुमारास घडली.**

पिंपरी चिंचवड शहरामध्ये सोमवारी सायंकाळी अचानक वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली.अचानक आलेल्या जोरदार पावसामुळे काही नागरिकांनी होर्डिंगच्या जवळ असलेल्या पंक्चरच्या दुकानात आश्रय घेतला होता. वादळामुळे या दुकानावर होर्डिंग कोसळल्याने पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

स्थानिक पोलीस, प्रशासन आणि अग्निशमन विभागाकडून क्रेनच्या साह्याने होर्डिंग बाजूला करण्यातआले. वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजी गवारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी किवळे येथे होर्डिंग पडल्याची माहिती मिळाली. त्यानुसार रावेत पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन कटरच्या साह्याने होर्डिंग तोडले. तसेच जेसीबीच्या सहाय्याने होर्डिंग बाजूला करून जखमींना नजीकच्या रुग्णालयात दाखल केले.

### मृत्युमखी व जमखी व्यक्तींची नावे :

» शोभा टाक (वय- ५०), वर्षा केदारी (वय- ५०), रामअवध आत्मज (वय- ६०), भारती मंचक (वय- ३३), अनिता रॉय (वय- ४५) अशी दुर्घटनेत मृत्युमूखी पडलेल्या व्यक्तींची नावे आहेत. तसेच, विशाल यादव (वय- २०), रहमद अन्सारी (वय- २१), रिंकी दिलीप रॉय (वय- ४५) अशी जखमी व्यक्तिंची नावे आहेत. पिंपरी चिंचवड शहरात मागील दोन-तीन दिवसापासून पाऊस जोरदार हजेरी लावत आहे. पावसाचा जोर वाढत असतानाच नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. आज पिंपरी चिंचवड कराना जोरदार पावसाने धो-धो धुतले. तर दुसरीकडे रिक्षा चालकाने भाडे आकारणीत देखील दुप्पट किमतीने वाढ केली.

### पावसाने धुतले अन् रिक्षाचालकांनी लूटले...

» मुकाई चौक येथील बस स्थानकावर प्रवाशांची गर्दी मोठ्या प्रमाणात असते. रिक्षा चालक ही मोठ्या प्रमाणात आपला व्यवसाय येथे करत असतात. पावसाच्या जोरदार सरीमुळे रिक्षांचे भाडेही डबल झालेले पहावयास मिळाले. मुकाई चौक ते शिरगाव जाण्यासाठी रिक्षा चालक एरवी दीडशे रुपये भाडे आकारत असतो. परंतु, प्रवाशांनी विचारले असता, मुकाई चौक ते शिरगाव तीनशे रुपये भाडे सांगण्यात येत आहेत. येथे सर्वसामान्यांची लूट झाल्याचा प्रकार आढळून आल्याचे स्पष्ट होते. एकीकडे पिंपरी चिंचवड शहरातील रिक्षाचालक हे नेहमी त्यांच्या समस्या समोर आणत असता, तर दुसरीकडे प्रवाशांच्या समस्या आढळून आल्या की त्यांना लुटण्याची संधी देखील सोडत नाहीत. असे मत येथील प्रवाशी व्यक्त करत आहेत.



### नेते, अधिकाऱ्यांची रुग्णालयात धाव...

» रावेत येथे होर्डिंग कोसळून जखमी झालेल्या व्यक्तींना ओजस हॉस्पिटल रावेत याठिकाणी उपचारासाठी दाखल करण्यात आले असून, जिल्हाधिकारी राजेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील, अतिरिक्त आयुक्त जितेंद्र वाघ, माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी लक्ष्मण गोफणे यांनी प्रत्यक्ष भेट देवून जखमींची विचारपूस केली. तसेच, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नाना काटे यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थितीची माहिती घेतली. चिंचवड विधानसभेच्या आमदार अश्विनीताई जगताप यांनी ओजस हॉस्पिटलला भेट देवून जखमींची चौकशी करून हॉस्पिटल प्रशासनाकडून माहिती घेतली.

# अजित पवारांची फक्त चर्चाच!

## पडद्यामागे वेगळ्याच हालचाली : राष्ट्रवादीचे 10 नेते फुटणार?

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व विरोधी पक्षनेते अजित पवार भाजपसोबत जाणार असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. मात्र, राजकीय वर्तुळातून आणखी एक बातमी समोर येत आहे. त्यामुळे राजकारणात खळबळ उडणार आहे.**



राष्ट्रवादीला येत्या काहीच दिवसात खिंडार पडणार आहे. मात्र, पक्षांतर करणारा हा गट अजित पवार यांचा नसून अनेक वरिष्ठ नेत्यांचा आहे. हे नेते पक्षांतर करणार आहेत. यामध्ये मंत्रिपदे भोगलेल्या राष्ट्रवादीच्या (NCP) अनेक वरिष्ठ नेत्यांचा समावेश आहे.

गेले काही काळ वारंवार होणाऱ्या केंद्रीय तपास यंत्रणांच्या धाडींच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या गटात अस्वस्थता पसरली आहे. त्याच पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांमध्ये अजित पवार नाराज असल्याच्या चर्चांना देखील उधाण आले आहे. यातच आता राष्ट्रवादीचे १० जण भाजपच्या (BJP) मार्गावर आहेत. हे सगळे ज्येष्ठ नेते असून महत्वाची खाती सांभाळलेले बहुतांश पश्चिम महाराष्ट्रातील नेते आहेत, असे वृत साम टिव्हीने सूत्रांच्या हवाल्याने दिले आहे.

दरम्यान, अजित पवार यांनी ट्वीट करत म्हटले आहे की "खारघर (नवी मुंबई) येथे रविवारी झालेल्या 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार सोहळ्यात झालेल्या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या श्रीसदस्यांच्या कुटुंबियांना व उष्माघातामुळे बाधित झालेल्या श्रीसदस्यांना भेट देऊन त्यांना धीर देण्यासाठी मी 'एमजीएम' हॉस्पिटलमध्ये सोमवारी पहाटेपर्यंत उपस्थित होतो."

"सोमवारी माझा कोणताही नियोजित कार्यक्रम नव्हता. मी मुंबईतच आहे. उद्या, मंगळवार दि. १८ एप्रिल २०२३ रोजी मी विधानभवनातील माझ्या कार्यालयात उपस्थित राहणार असून कार्यालयाचे नियमित कामकाज सुरु राहणार आहे. मंगळवारी मी आमदारांची बैठक बोलावल्याच्या बातम्या काही माध्यमातून प्रसिद्ध होत आहेत, त्या पूर्णत: असत्य आहेत. मी आमदार अथवा पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली नाही, याची नोंद घ्यावी." असे पवार यांनी स्पष्ट केले आहे.

दरम्यान, या पार्श्वभूमीवर पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे (ANNA BANSODE) यांनी 'जिथे दादा तिथे मी' असे वक्तव्य केल्याने राजकीय वर्तुळातून अश्चर्य व्यक्त केले जात आहे. "राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसह राज्यातील सर्वांना माहिती आहे की मी अजितदादांचा कट्टर समर्थक आहे. ते उद्या जो निर्णय घेतील तो मला आजच मान्य आहे. दादा जातील तिकडे जाणार. शेवटपर्यंत मी त्यांच्यासोबत राहणार आहे." असे बनसोडे यांनी स्पष्ट केले. त्यामुळे चर्चा होत आहे.

"अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांच्या पहाटेच्या शपथविधी कार्यक्रम झाला. त्या कार्यक्रमाचा साक्षीदार असल्याचे समाधान आणि अजित पवारांना साथ दिली याचा आनंद आहे. तो शपथविधी राष्ट्रपती राजवट उठवण्यासाठी होता, हे शरद पवार यांनी सांगितले. त्यामुळे मी जे केले ते योग्यच होते." असेही बनसोडे म्हणाले.

---

# बाजार समितीच्या अधिकाऱ्यांवर दाखल गुन्हे मागे घेण्यासाठी मार्केट यार्ड पोलीस ठाण्यावर मोर्चा

## बेकायदा व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांवर बाजार समिती प्रशासनाची कारवाई

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**मार्केट यार्डातील बाजार आवारात बेकायदा व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध कारवाई केल्याने बाजार समितीच्या अधिकाऱ्यांच्या विरोधात दाखल केलेले गुन्हे मागे घेण्यात यावे, या मागणीसाठी बाजार आवारातील अडते, कामगार, हमालांकडून सोमवारी मार्केट यार्ड पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला.**

### मार्केट यार्ड पोलीस ठाण्यावर मोर्चा

**बेकायदा व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांवर बाजार समिती प्रशासनाने कारवाई केली. या कारवाईसाठी पोलीस बंदोबस्त घेण्यात आला होता. सहा महिन्यांनंतर मार्केट यार्डात बेकायदा लिंबू विक्री करणाऱ्या महिलेने जातीवाचक शिवीगाळ, तसेच विनयभंग केल्याची तक्रार मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात दिली. त्यानंतर बाजार समितीचे अधिकारी, अडते संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह २० ते २५ जणांविरुद्ध जातीवाचक शिवीगाळ, तसेच विनयभंग केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केल्याने भविष्यात बेकायदा व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्यास अधिकारी धजावणार नाहीत. बाजार समितीचे अधिकारी आणि अडत्यांवर दाखल केलेले गुन्हे त्वरीत मागे घेण्यात यावे, या मागणीसाठी मार्केट यार्ड बाजार आवारातील सर्व घटकांनी सोमवारी मार्केट यार्ड पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला.**



सहा महिन्यांपूर्वी मार्केट यार्डाच्या आवारात बेकायदा व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांवर बाजार समिती प्रशासनाने कारवाई केली. या कारवाईसाठी पोलीस बंदोबस्त घेण्यात आला होता. सहा महिन्यांनंतर मार्केट यार्डात बेकायदा लिंबू विक्री करणाऱ्या महिलेने जातीवाचक शिवीगाळ, तसेच विनयभंग केल्याची तक्रार मार्केट यार्ड पोलीस ठाण्यात दिली. त्यानंतर बाजार समितीचे अधिकारी, अडते संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह २० ते २५ जणांविरुद्ध जातीवाचक शिवीगाळ, तसेच विनयभंग केल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. कारवाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केल्याने भविष्यात बेकायदा व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्यास अधिकारी धजावणार नाहीत. बाजार समितीचे अधिकारी आणि अडत्यांवर दाखल केलेले गुन्हे त्वरीत मागे घेण्यात यावे, या मागणीसाठी मार्केट यार्ड बाजार आवारातील सर्व घटकांनी सोमवारी मार्केट यार्ड पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला.

याबाबत बाजार आवारातील अडते संघटना, व्यापारी संघटनेकडून मुख्यमंत्री, गृहमंत्री, पुणे पोलीस आयुक्तांना निवेदन देण्यात आले. मार्केट यार्डातील अडते, कामगार, हमाल, तोलणार, टेम्पो चालकांनी सोमवारी काळ्या फिती बांधून कारवाईचा निषेध केला. मार्केट यार्ड पोलीस ठाण्यावर मूक मोर्चा काढण्या आला. मार्केट यार्ड पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनघा देशपांडे यांना निवेदन देण्यात आले. श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड अडते संघटनेचे अध्यक्ष अनिरुद्ध भोसले, ज्येष्ठ अडते गणेश घुले, माजी अध्यक्ष विलास भुजबळ, सचिव करण जाधव, युवराज काची, राहुल कोंढरे, तोलणार संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र चोरघे, कामगार संघटनेचे विशाल केकाणे, संतोष नांगरे, नितीन जामगे, राजेंद्र सूर्यवंशी यांच्यासह बाजार समितीचे कर्मचारी मोर्चात सहभागी झाले होते.

# शेवटपर्यंत दादांसोबत : बनसोडे

## » राजकीय तर्कवितर्कांना उधाण: अजित पवार यांच्यासोबत अण्णा बनसोडे

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विरोधी पक्ष नेते अजित पवार जो निर्णय घेतील, त्या निर्णयासोबत मी असेन, अशी ठाम भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे पिंपरी विधानसभेचे आमदार अण्णा बनसोडे यांनी घेतली आहे. अण्णा बनसोडे आज मुंबईत जाऊन अजित पवारांची भेटही घेणार आहेत. हे तेच अण्णा बनसोडे आहेत, जे पहाटेच्या शपथविधीवेळी अजित पवारांसोबत होते.**





राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार १०-१५ आमदार घेऊन भाजपाबरोबर जाणार असल्याच्या चर्चांना उधाण आलं आहे. इतकंच नाही, तर अजित पवारांनी त्यांच्या समर्थक आमदारांची बैठक बोलावल्याचे वृत्तही प्रकाशित झाले. यानंतर आता अखेर अजित पवारांनी या आमदारांच्या बैठकीच्या वृत्तावर भूमिका स्पष्ट केली. तसेच सोमवारच्या दिवसभरातील नियोजित कार्यक्रमावरही भाष्य केलं.

याबाबत बोलताना अजित पवार म्हणाले की, “खारघर (नवी मुंबई) येथे रविवारी झालेल्या ‘महाराष्ट्र भूषण’ पुरस्कार सोहळ्याच्यावेळी झालेल्या दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या श्रीसदस्यांच्या कुटुंबियांना आणि उष्माघातामुळे बाधित झालेल्या श्रीसदस्यांना भेट देऊन त्यांना धीर देण्यासाठी मी ‘एमजीएम’ हॉस्पिटलमध्ये सोमवारी पहाटेपर्यंत उपस्थित होतो. सोमवारी माझा कोणताही नियोजित कार्यक्रम नव्हता, मी मुंबईतच आहे.”

### मी कोणतीही बैठक बोलावली नाही : अजित पवार

» “मंगळवारी (१८ एप्रिल) मी विधानभवनातील माझ्या कार्यालयात उपस्थित राहणार आहे. तेथे कार्यालयाचे नियमित कामकाज सुरू राहणार आहे. मंगळवारी मी आमदारांची बैठक बोलावल्याच्या बातम्या काही माध्यमातून प्रसिद्ध होत आहेत, त्यापूर्णतः असत्य आहेत. मी आमदार अथवा पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली नाही, याची नोंद घ्यावी,” असा खुलासा अजित पवार यांनी केला.

“ शेवटच्या क्षणापर्यंत अण्णा यांनी अजित पवारांना त्या वेळीही पाठिंबा दिला होता, आताही अजित पवार भूकंप करतील, अशी चर्चा सुरू असताना, तेच अण्णा त्यांच्या पाठीशी उभे राहायला तयार झालेत. दादा जो निर्णय घेतील त्याला माझी सहमती असेल अन् शेवटपर्यंत मी त्यांच्यासोबत असेन.

- अण्णा बनसोडे, आमदार.

---

# माझी ओळख टायगर ग्रुप अन् तानाजीभाऊंमुळेच!

## » युवा सेना पुणे जिल्हाप्रमुख अनिकेत घुले : वाढदिवसानिमित्त विविध समाजिक उपक्रम

।पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**युवा सेना आणि राजकीय, सामाजिक क्षेत्रात पुणे जिल्ह्यात काम करीत असलो तरी, माझी खरी ओळख टायगर ग्रुप आणि तानाजीभाऊंमुळेच निर्माण झाली. त्यांची मला सामाजिक क्षेत्रात काम करण्याची दिशा दिली. त्यामुळे आज मी समाजासाठी काम उभा करण्याचा प्रयत्न करीत आहे, अशा भावना युवा सेना पुणे जिल्हाप्रमुख अनिकेत घुले यांनी व्यक्त केल्या.**



टागयर ग्रुप महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात प्रचंड काम करणारी सर्वात मोठी तरुणांची संघटना म्हणून ओळखली जाते. संस्थापक तानाजी जाधव यांच्या नेतृत्वाखाली देशभरात संघटनेचे जाळे विस्तारले आहे. टायगर ग्रुप महाराष्ट्रच्या वतीने अनिकेत घुले यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. ढोल-ताशांच्या गजरात घुले यांचे करमाळा येथे स्वागत करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यात पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

अनिकेत घुले म्हणाले की, तानाजीभाऊंनीच समाजसेवेचे वेड लावले. त्यांनी खांद्यावर हात ठेवला आणि आधार दिला. त्यामुळेच पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्रात काम करु शकलो.

माझ्यासह टायगर ग्रुपच्या सदस्यांच्या नावाचा लौकीक वाढवण्याचे काम तानाजीभाऊंमुळे होत आहे. महाराष्ट्रातील सामाजिक क्षेत्रात तानाजीभाऊंसारखे नेतृत्व तयार झाले, याचे समाधान वाटते.

### वाढदिनी जपली सामाजिक बांधिलकी...

» दरम्यान, अनिकेत घुले यांच्या वाढदिवसानिमित्त टायगर ग्रुपच्या सदस्यांनी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले. शिवभक्त प्रतिष्ठान आणि प्रतापराजे निर्मळ पाटील यांच्या पुढाकाराने गरीब व गरजू शालेय विद्यार्थ्यांना सायकल वाटप करण्यात आले. तसेच, प्रसाद रानवडे यांच्या पुढाकाराने सोमेश्वरवाडी, पाषाण येथे सोमेश्वर मंदिरात अभिषेक व अन्नदान, डॉक्टर व्हेरिफाय डायग्रोस्टिक व क्लिनिक येथे मोफत आरोग्य शिबीर, हिंदवी ऑप्टिकच्या पुढाकाराने मोफत नेत्रतपासणी आणि अल्प दरात चष्मे वाटप, आदिवासी पाड्यावरील महिलांना साडी व लहान मुलांना खाऊ वाटप, अनाथ आश्रमांमध्ये अन्नदान व फळ वाटप, गरिब व्यक्तींना ब्लँकेट व चादर वाटप, तसेच धायरी येथील ज्ञान गंगोत्री मतिमंद मुलांच्या शाळेत अन्नदान करण्यात आले. अभिनेता सागर शेला यांच्या पुढाकाराने विद्यार्थ्यांसाठी अल्पदरात संगणक वाटप, मयूर शिरुपाल यांच्यातर्फे दिपगृह बालनगरी येथील अनाथालयात मदत, अजय ऐवळे यांच्या वतीने गरजू नागरिकांना किराणा वाटप, रितेश शिर्के यांच्या पुढाकाराने श्रीलोचन बालविकास केंद्र येथे अन्नदान व शालेय साहित्य भेट, समीर नदाफ यांच्यातर्फे मुस्लिम बांधवांना रमजान निमित्त मिठाई वाटप, दिनेश पाटोळे यांच्यातर्फे श्री बोरमलनाथ गोशाळज्ञ येथे ३०० गायींना चारा वाटप, बाबुराजे सावंत यांच्या पुढाकाराने प्रमिलाबाई नौपतलाल हैंडीकैप सेंटर येथे अन्नदान असे भरगच्च उपक्रम झाले.

## संपादकीय »

### मोदी नको, मग दुसरा कोण?

***एका बाजूला पंतप्रधान नरेंद्र मोदींना पर्याय नाही, असे भाजपवाले म्हणत आहेत, तर दुसऱ्या बाजूला विरोधात असलेले अनेक पक्ष नरेंद्र मोदींना पर्याय उभा करण्यासाठी महासंघटन उभारण्यासाठी झटत आहेत.***

जो महाविकास आघाडीचा प्रयोग करून महाराष्ट्रातील सत्ता भाजपकडून काढून घेण्यात आली तोच प्रयोग अधिक व्यापकतेने राष्ट्रीय पातळीवर वापरून केंद्रातूनही भाजपला हटवता येईल, असा विश्वास बाळगून काँग्रेससोबतच अनेक विरोधी पक्षांच्या नेत्यांचे प्रयत्न सुरू आहेत. प्रादेशिक पक्षांचे नेते एकमेकांना भेटून आपण मोदींना हटवले पाहिजे, यासाठी चर्चा आणि विचारविनिमय करत असतात. त्याचाच एक भाग म्हणून आम आदमी पार्टीचे प्रमुख आणि दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल हे उद्धव ठाकरे यांना भेटून गेले, त्यांच्यासोबत पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान हेदेखील होते. तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव हे महाराष्ट्रात टीव्ही चॅनेलवर आपल्या सरकारच्या विकासकामांची जोरदार जाहिरातबाजी करत असतात. काही वेळा ते महाराष्ट्रात सभा घेत असतात. त्यांनी भारत राष्ट्र समितीची स्थापना केलेली आहे. आपल्या पक्षाचा विस्तार राष्ट्रीय पातळीवर करून आपल्याला पंतप्रधानपदापर्यंत पोहोचण्याचे संकेत ते देत आहेत. ममता बॅनर्जी काही वेळा महाराष्ट्रात येऊन जात असतात. महाराष्ट्रात आणि दिल्लीच्या राजकारणात अनेक वर्षे मुरलेल्या शरद पवार यांना भेटून मोदी हटावची रणनीती आखत असतात. त्यात पुन्हा गोम अशी आहे की, जेव्हा राष्ट्रीय पातळीवर तिसरी आघाडी स्थापन करून सत्ता मिळवायची असते तेव्हा त्या तिसऱ्या आघाडीला भाजप किंवा काँग्रेस या राष्ट्रीय पातळीवर प्रभाव असलेल्या पक्षांचा पाठिंबा लागतो, त्याशिवाय ते शक्य नसते. हे मागील काळात दिसून आलेले आहे, त्यासाठी विरोधात असलेल्या विविध पक्षांना काँग्रेसला आपल्यासोबत घ्यावे लागणार आहे, पण ममता बॅनर्जी आणि काँग्रेस यांच्यामधून विस्तव जात नाही. ममता बॅनर्जी यांना कोण समजावणार हा मोठा प्रश्न आहे. त्या तर राहुल गांधी यांच्यावर थेट बोचरी टीका करतात. असे असेल तर काँग्रेस तिसऱ्या आघाडीच्या जवळ कसा येणार हा प्रश्न आहे. त्यात पुन्हा काँग्रेसजनांना काहीही करून राहुल गांधी यांना पंतप्रधान बनवायचे आहे. त्यासाठीच त्यांना पक्षाचे उपाध्यक्ष आणि नंतर अध्यक्ष करण्यात आले होते. पण मागील लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचा दुसऱ्यांदा जो मोठा पराभव झाला, त्याचा धसका घेतलेल्या राहुल गांधी यांनी अध्यक्षपदाचा त्याग केला होता.




# भटक्या श्वानांच्या समस्येला माणूसही तितकाच जबाबदार



अगदी अलीकडचे उदाहरण आहे मुंबईमधले. येथील कांदिवलीमधील एका सोसायटीत राहणाऱ्या पारोमिता पुरथन या प्राणीप्रेमी महिलेने श्वानांसाठी उच्च न्यायालयात धाव घेतली. तिचे असे म्हणणे होते की तिच्या सोसायटीच्या परिसरातील १८ भटक्या श्वानांची ती काळजी घेते. त्यांना खायलाप्यायला घालते, त्यांची काळजी घेते. पण ती राहते ती सोसायटी तिला सोसायटीच्या आवारात हे काम करण्यासाठी परवानगी देत नाही. श्वानांना सोसायटीच्या आवारात बोलावून खायला घालण्यासाठी मज्जाव केला जातो. एवढेच नाही तर तिने असे करू नये यासाठी बाऊन्सर नेमले गेले आहेत. बाऊन्सर नेमले जाण्याच्या मुद्द्याचा सोसायटीने इन्कार केला असला तरी पारोमिता पुरथन यांचे बाकीचे मुद्दे फेटाळून लावलेले नाहीत.

यातला चर्चेचा मुद्दा आहे तो म्हणजे या प्रकरणासंदर्भातील उच्च न्यायालयाच्या मताचा. न्या. जी. एस. कुलकर्णी आणि न्या. आर. एन. लद्धा यांच्या खंडपीठाने भटक्या श्वानांशी क्रौर्याने तसेच तिरस्काराने वागणे चुकीचे आहे, असे मत व्यक्त केले आहे. एवढेच मत व्यक्त करून न्यायालय थांबले नाही, तर भटके श्वान हे आपल्या समाजाचाच भाग आहेत आणि त्यांची काळजी आपण घेतली पाहिजे असे मत न्यायालयाने व्यक्त केले आहे. ते करताना न्यायालयाच्या आवारातील भटक्या श्वानांचे आणि मांजरींचे उदाहरण देऊन या आवारात त्यांची कशी काळजी घेतली जाते हे देखील सांगितले.


न्यायालयाचे हे मत प्राणीप्रेमींमध्ये आनंद निर्माण करणारे तर इतरांमध्ये राग, तिरस्कार या भावना निर्माण करणारे आहे, कारण या प्रश्नाला मुळातच दोन बाजू आहेत, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. पारोमिता पुरथन यांच्यासारखी भटक्या श्वानांवर प्रेम करणारी, भूतदया दाखवणारी, करूणा बाळगणारी मंडळी आसपास दिसतात, तशीच भटक्या श्वानांना घाबरणारी, त्यांच्या हल्ल्यात जखमी झालेली, त्यांच्या चाव्यामुळे रेबीज झालेली, त्यावर औषधोपचार घ्यावा लागलेली मंडळीही मोठ्या प्रमाणात आहेत. मोठ्या शहरांमध्ये रात्री उशिरा कामाहून परतणारी किंवा सकाळी चालण्यासाठी बाहेर पडणारी मंडळी भटक्या श्वानांच्या उच्छादाला घाबरून असतात, कारण रस्त्यावर टोळीने वावरणारे हे भटके श्वान अनेकदा टोळीने अंगावर धावून येतात, असं त्यांचे म्हणणे असते. भटक्या श्वानांनी लचके तोडल्यामुळे लहानग्यांचा मृत्यू अशा बातम्याही अनेकदा वाचायला मिळतात. अशा वेळी माणूस महत्त्वाचा की रस्त्यावरचा श्वान असा प्रश्न प्राणीप्रेमी मंडळींना आवर्जून विचारला जातो. तुमच्या अंगावर जर भटक्या श्वानांची टोळी धावून आली तर तेव्हाही तुम्ही काय भूतदया दाखवत बसणार आहात की काय, असा मुद्दाही मांडला जातो. भटक्या श्वानांचा उपद्रव मोठा आहे, हा मुद्दा नाकारण्याजोगा नाही, हे खरेच आहे. पण म्हणून या श्वानांना विष खायला घालून मारणे, त्यांना जिवंत जाळणे हे प्रकार अजिबातच समर्थनीय नाहीत. हा प्रश्न सोडवण्यासाठी मुळात आपल्याला हे मान्य करावे लागेल की हा प्रश्न श्वाननिर्मित नसून मानवनिर्मित आहे.भटक्या श्वानांची संख्या वाढण्यासाठी मुळात दोन गोष्टी कारणीभूत आहेत. एक म्हणजे त्यांच्या निर्बीजीकरणातील अपयश आणि दुसरे म्हणजे शहरांमधली सामाजिक परिस्थिती. तीसेक वर्षांपूर्वी भटक्या श्वानांना सरळ मारून टाकले जात असे. त्यातून त्यांची संख्या नियंत्रणात रहात असे. त्यांना पकडून नेणाऱ्या डॉग व्हॅन हा एकेकाळी चर्चेचा विषय होता. पण त्यांना अशा पद्धतीने मारणे हे क्रौर्य आहे, असे सांगून न्यायालयाने त्यावर बंदी आणली. आणि त्यांचे निर्बीजीकरण करायला सांगितले. पण भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण करणे हे अर्थातच अवघड नसले तरी सोपेदेखील नाही. आपल्या यंत्रणांवरील इतर कामांचा ताण, त्यांचे प्राधान्यक्रम आणि कामाच्या पद्धतीतील त्रुटी यामुळे या निर्बीजीकरणाला मर्यादा पडल्या आणि भटक्या श्वानांची संख्या झपाट्याने वाढत गेली. रस्त्यावर राहणारी ही श्वानमंडळी बघता बघता टोळ्या करून रहायला लागली.

# तैवान आणि चीन : संघर्ष की, नवे जागतिक युद्ध?

**आशिया खंडातील तैवान आणि चीन या दोन राष्ट्रांमधील संघर्ष सध्या आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चेचा विषय ठरला आहे, कारण शनिवारपासून चीनच्या लष्कराने तैवानच्या चारही बाजूने आपल्या लष्कराचे संचलन सुरू केले आहे.**

तैवान हे चीनच्या पूर्व बाजूस प्रशांत महासागरात स्थित असलेले एक लहान राष्ट्र आहे. तैवान स्वतंत्र राष्ट्र असेल तरीही चीन मात्र अद्यापही तैवान हा चीनचा भाग असल्याचा वारंवार दावा करतो. दोन्ही राष्ट्रांच्या क्षेत्रफळाच्या दृष्टीने विचार केल्यास चीन हा तैवानपेक्षा अधिक बलाढ्य आहे, परंतु तरी देखील तैवानने आंतरराष्ट्रीय स्तरावर विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात स्वतःची एक वेगळी उंची गाठली आहे. त्याचबरोबर तैवानने अमेरिका या महासत्तेच्या नेहमी आशयाखाली आपलं अस्तित्व बाधित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. तैवान आणि अमेरिका यांच्यातील मैत्री हीच तैवान – चीन यांच्या वादातील प्रमुख कारण असते.

आताही काही दिवसांपूर्वी तैवानच्या राष्ट्राध्यक्षा त्साय इंग-वेन या १० दिवसीय अमेरिका दौऱ्यावर होत्या. या दौऱ्यात त्यांनी अमेरिका संसदेचे अध्यक्ष केविन मॅकार्थी यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान तैवान – अमेरिका यांच्यात परराष्ट्रीय संबंध,




आर्थिक, सामरिक व संरक्षण या प्रमुख मुद्द्यांवर चर्चा झाली. याच कारणामुळे चीन पीपल्स लिब्रेशन आर्मीच्या पूर्व कमांड वरून शनिवारी अचानक घोषित करण्यात आले की, तैवान भौवती तीन दिवसीय चीन लष्कराचे संचलन म्हणजे युद्ध सराव करण्यात येईल.

याआधीही चीनने आपल्या पूर्व बाजूला लष्कराचे संचलन किंवा युद्ध सराव केला होता हा सराव तैवान – चीन यांच्यातील सागरी सीमा रेषा म्हणजे तैवान स्ट्रेट मिडन लाईनच्या अलीकडे असायचा, परंतु या यावेळेस चीनने ही रेषा ओलांडून आपले लष्करी संचलन सुरू केले. विशेष म्हणजे संचलनात चीनच्या लष्करामार्फत जवळपास ७० फायटर जेटस्, ९ वॉर शिप्स तसेच मिसाईल, नेवल डिस्ट्रोयर, बॉम्बर्स, जामर्स इ. सर्व रसद म्हणजे सागरी क्षेत्रात एखाद्या जागतिक युद्धाच्या सुरवातीस लागणारी तयारी चीनमार्फत करण्यात आलेली आहे. तसेच हे संचलन तैवानच्या चारही बाजूने केले जाईल, असे चीनकडून स्पष्ट करण्यात आले आहे. चीनच्या या कृत्याचा विचार करता आणि रशिया – युक्रेन यांच्यातील युद्धाचा दाखला घेता तैवानवर कधीही चीनचे लष्कर आक्रमण करून एका युद्धाची सुरवात करू शकते.चीनसाठी तैवान अनेक कारणांसाठी महत्वाचा आहे. 'सेमी-कंडक्टर' उत्पादनात तैवान अग्रेसर आहे. अमेरिकेस तैवानमार्फत सर्वात जास्त 'सेमी-कंडक्टर' ची निर्यात केली जाते. ही निर्यात बंद झाल्यास त्याचा परिमाण हा अमेरिकेच्या तंत्रज्ञान व अर्थ व्यवस्थेवर आणि एकूणच विकासावर होईल. दक्षिण कोरिया, जपान आणि फिलीपाईन्स या राष्ट्रांना तैवानमार्फत तेल पुरवठा केला .

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## राष्ट्रवादीतील संभाव्य फुटीने

# भाजपा-शिंदे गटात अस्वस्थता!

### अजित पवार यांची भाजपासोबत जाण्याची चर्चा सुरू; शिंदे गट, भाजपातील काही नेतेही हवालदिल

।मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीत संभाव्य फूट पडणार असल्याच्या चर्चेने भाजपा तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात अस्वस्थता पसरली आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या विस्ताराकडे डोळे लावून मंत्रिपदासाठी गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या भाजपा आणि शिंदे गटातील आमदारांना अजित पवार खरेच भाजपमध्ये आले तर आपले काय? अशी चिंता सतावू लागली आहे.**

कोणालाही मनापासून सोडून जायचे नाही, पण कुटुंबाला टार्गेट केले जात आहे. कुणाला काही व्यक्तिगत निर्णय घ्यायचे असतील तर तो त्यांचा प्रश्न, पण 'पक्ष' म्हणून आम्ही भाजपाबरोबर जाण्याचा निर्णय घेणार नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार (NCP CHIEF SHARAD PAWAR) यांनी म्हटले आहे. माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याबरोबर खासदार संजय राऊत यांनी अलीकडेच शरद पवारांची भेट घेतली, त्यावेळी शरद पवार यांनी हे वक्तव्य केले. आता अजित पवारांनी भाजपाला साथ देण्याचा निर्णय घेतला तर, सत्तेचे समीकरण बिघडणार आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थिर असताना अजित पवारांना सोबत घेण्याची घाई करू नये, असे भाजपा आणि शिंदे



गटातील आमदारांचे म्हणणे आहे.

गेल्या आठवड्यात अजित पवार हे नॉट-रिचेबल होते. तेव्हापासून ते भाजपासोबत जाणार अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या मुंबई दौऱ्यानंतर आणि राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांनी पक्षात फूट पडू शकते यांची कल्पना उद्धव ठाकरे यांना दिल्यानंतर अजित पवार यांच्या बंडाबाबत उलटसुलट चर्चा सुरू आहे. खुद्द अजित पवार यांनी आपण अमित शाह यांची भेट घेतली नसल्याचे स्पष्ट केले आहे. अशातच भाजपा आणि शिंदे गटातील नेत्यांकडून अजित पवार आमच्यासोबत आले तर त्यांचे स्वागत आहे, असे विधान करून अजितदादांविषयी संभ्रम आणखी वाढवला आहे.

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड करून राज्यात सत्ता परिवर्तन केले. सत्ता बदलानंतर जवळपास 40-42 दिवसांनी मंत्रिमंडळ विस्तार करण्यात आला. 9 ऑगस्ट 2022 रोजी मंत्रिमंडळ विस्तार होऊन 18 जणांना कॅबिनेट मंत्री बनविण्यात आले. तेव्हापासून भाजपा आणि शिंदे गटातील इच्छुकांचे लक्ष मंत्रिमंडळ विस्ताराकडे लागले आहे. पण आता विस्तार बाजूला राहिला आणि अजित पवार यांच्या भाजपासोबत जाण्याची चर्चा सुरू झाली. त्यामुळे शिंदे गट आणि भाजपातील काही नेतेही हवालदिल झाले आहेत. अजित पवारांनी भाजपाशी हातमिळवणी केली तर, त्यांना आणि त्यांच्यासोबत येणाऱ्या आमदारांना सत्तेत वाटा द्यावा लागले. त्यामुळे शिंदे गट आणि भाजपाच्या आमदारांना नाईलाजाने सत्तात्याग करावा लागू शकतो. विधानसभा निवडणुकीला जेमतेम वर्ष-दीड वर्ष शिल्लक असताना अजित पवारांसाठी सत्तेवर पाणी सोडण्याची बहुतांश आमदारांची तयारी नाही. या पार्श्वभूमीवर भाजपाला स्वकीयांची नाराजी पत्करून अजित पवारांना सत्तेत बसवावे लागेल.

शरद पवार यांनी कुणी काहीही निर्णय घेतला तरी आपण महाविकास आघाडीसोबतच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे अजित पवार दोन तृतीयांश आमदार सोबत घेऊन बाहेर पडण्यात यशस्वी होतील किंवा कसे, याविषयी राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. आजच्या घडीला 15 ते 16 आमदार अजित पवारांना साथ देऊ शकतात, असा अंदाज आहे. त्यात धनंजय मुंडे (परळी), आदिती तटकरे (श्रीवर्धन), अनिल पाटील (अमळनेर), दिलीप बनकर (निफाड), माणिकराव कोकाटे (सिन्नर), अण्णा बनसोडे (पिंपरी), संजय बनसोडे (उदगीर), सुनील भुसारा (विक्रमगड), यशवंत माने (मोहोळ), नितीन पवार (कळवण), बाबासाहेब पाटील (अहमदपूर), सुनील शेळके (मावळ), संदीप क्षीरसागर (बीड) या विधानसभा आमदारांचा समावेश आहे.

# राजकारण करु नका!

### श्री सेवकांचा उष्माघाताने मृत्यू क्लेषदायक



। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी श्री सेवकांचा उष्माघाताने झालेल्या मृत्यू बद्दल शोक व्यक्त केला आहे. महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा लाखो श्रीसेवकांच्या उपस्थितीत रविवारी पार पडला होता. त्यावेळी उष्माघाताने 13 श्रीसेवकांचा मृत्यू झाल्याने पुरस्कार सोहळ्याला गालबोट लागले. त्यानंतर या कार्यक्रमाच्या जंगी आयोजनावर प्रश्न उपस्थित होऊ लागले. श्री सेवकांचा झालेला हा मृत्यू क्लेषदायक आहे. या घटनेवर कोणीही राजकारण करू नये असे आवाहनही आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी केले.

श्री सेवकांच्या मृत्यूनंतर आप्पासाहेबांनी एक जाहीर निवेदन प्रसिद्ध केले आहे. यामध्ये त्यांनी म्हटले की, महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या महाराष्ट्रभूषण पुरस्कार सोहळ्यासाठी खारघर येथे आलेल सारे श्री सदस्य हे माझ्या कुंटुबाचे सदस्य आहेत. श्री सदस्यांचा हा परिवार देशविदेशात पसरला आहे. या पुरस्कार सोहळ्यावेळी उष्माघाताने काही श्री सदस्यांना त्रास झाला आणि त्यातील काहींचा दुर्देवाने मृत्यू झाला. ही घटना माझ्यासाठी अत्यंत क्लेषदायक आहे. माझ्या कुटूंबातीलच सदस्यांवर कोसळलेली ही आपत्ती आहे.

आपल्याच कुटूंबातील लोकांवर घाला येण्याच्या या घटनेने मी व्यथित आहे. माझे हे दुःख शब्दात व्यक्त करण्यापलिकडचे आहे. मृत्यू झालेल्या या सदस्यांच्या कुटूंबियांची आणि माझी वेदना सारखीच आहे. श्री सदस्य परिवाराची एकमेकांच्या सोबत राहण्याची पिढ्यानपिढ्यांची पंरपरा आहे त्यानुसार आम्ही सारेजण या आपदग्रस्तांसोबत कायम आहोत. यातील मृतांना सद्गती लाभो, तसेच त्यांच्या कुटूंबाला हा आघात सहन करण्याची शक्ती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना असल्याचे आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी म्हटले.

झालेला प्रकार दुर्दैवीच होता. त्याचे कोणत्याही पद्धतीने राजकारण होऊ नये. अशी आमची अपेक्षा असल्याचेही त्यांनी म्हटले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मृतांच्या वारसांना 5 लाखांची मदत जाहीर केली आहे. रविवारी रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी श्री सेवकांची विचारपूस केली. तर, मध्यरात्रीच्या सुमारास विरोधी पक्षनेते अजित पवार, शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, आमदार आदित्य ठाकरे यांनी एमजीएम रुग्णालयात जात उपचार घेत असलेल्या श्री सेवकांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

### 13 श्री सेवकांचा मृत्यू

**रविवारी, नवी मुंबई येथील खारघरमधील सेंट्रल पार्क मैदानावर महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळा दिमाखात पार पडला. या पुरस्कार सोहळ्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह अनेक नेतेमंडळींनी हजेरी लावली होती. यासोबतच हा अभूतपूर्व सोहळा याची देही, याची डोळा पाहण्यासाठी लाखो अनुयायांनी उपस्थिती लावली होती. सकाळी 10 वाजता सुरू होणारा कार्यक्रम हा उशिराने सुरू झाला आणि दुपारी संपला. मात्र, या कार्यक्रमानंतर अनेकांना उष्माघाताचा त्रास झाला. अनेकांना महात्मा गांधी मिशन रुग्णालयात दाखल करण्यात आले.**

### आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्याकडून दुखवटा

**उष्मा घाताने 13 जणांचा मृत्यू झाल्यामुळे आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी दुःखवटा पाळला आहे. पुढील दोन दिवस आप्पासाहेब आपल्या भक्तांना भेटणार नसल्याचं सांगण्यात आलं आहे. अलिबाग तालुक्यातील रेवदंडा येथील आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या निवासस्थानाबाहेर पुरस्कार सोहळ्यानिमित्त रांगोळी, फुलांची सजावट मोठ्या प्रमाणात करण्यात आली होती. मात्र, ही दुर्दैवी घटना घडल्यामुळे फुलांची सजावट रांगोळी फुलांची सजावट काढण्यात आली आहे.**

# चौथी पास राजा भ्रष्टाचारी!

## दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची टीका; आम आदमी पक्षाने शक्तिप्रदर्शन

**। नवी दिल्ली । महाईन्यूज ।**

**हजारो वर्षांचा इतिहास असलेल्या महान देशातील चौथी पास राजा अहंकारी होताच शिवाय तो भ्रष्टाचारीही होता, अशी टीका दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी कोणाचेही नाव न घेता केली. मद्यधोरणातील कथित घोटाळा प्रकरणी ‘सीबीआय’च्या चौकशीनंतर सोमवारी विधानसभेचे विशेष अधिवेशन आयोजित करून आम आदमी पक्षाने शक्तिप्रदर्शन केले.**



विधानसभेच्या विशेष सत्रात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी ‘चौथी पास राजा’ या कथेच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची खिल्ली उडविली. मोदी यांचे नाव न घेता त्यांनी टीका केली. या व्यक्तीचा जीवनपट नकारात्मक असल्याचे आणि ही व्यक्ती देशासाठी घातक असल्याचे आरोप त्यांनी केले.

मद्य धोरण गैरव्यवहार प्रकरणी चौकशीसाठी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) शुक्रवारी समन्स पाठविल्यानंतर केजरीवाल यांनी हे सत्र बोलाविण्याची घोषणा केली होती. या सत्रात दिल्ली सरकारचे मंत्री आणि आम आदमी पक्षाच्या (आप) नेत्यांवर सीबीआय आणि सक्तवसुली संचालनालयातर्फे (ईडी) होणाऱ्या कारवाई संदर्भात चर्चा केली जाणार होती. रविवारी सीबीआयने केजरीवाल यांची तब्बल नऊ तास चौकशी केली. या चौकशीत सीबीआय अधिकाऱ्यांकडून चांगली वागणूक मिळाल्याने केजरीवाल यांनी सोमवारी झालेल्या सत्रात ‘सीबीआय''चा उल्लेख न करता ‘चौथी पास राजा’ ही गोष्ट सांगितली. मात्र ज्या उद्देशाने सत्र बोलावले त्यास बगल देत केजरीवाल यांनी कथेला प्राधान्य दिले.

या कथेतील व्यक्तीरेखेचा केजरीवाल यांनी ‘अशिक्षित, चौथी पास, अहंकारी, भ्रष्टाचारी आणि राणी नसलेला राजा‘ असा उल्लेख केला. ते पुढे म्हणाले की, ‘एका गरीब घरात जन्मास आलेला हा राजा रेल्वे स्थानकावर चहा विकत होता. पुढे सम्राट झाल्यावर जवळच्या मित्राच्या सहकार्याने त्याने बँकांतील खजिना रिकामा केला. त्याने रेल्वे विकल्या, विमानतळे विकली, तीन काळे कृषी कायदे आणले, पेट्रोल-डिझेलचे भाव वाढवले. शिक्षणाबाबत कोणी माहितीच्या अधिकारात विचारणा केली तर संबंधित व्यक्तीला २५ हजार रुपयांचा दंड ठोठावण्यात येत होता. एके दिवशी हा राजा भ्रष्ट असल्यावर लोकांना विश्वास बसला आणि त्यांनी त्याला पदावरून खाली ओढले गेले.’भाजपच्या कार्यकर्त्यांनी सोमवारी दिल्ली विधानभवनाबाहेर जोरदार निदर्शने केली.भाजपची निदर्शने

केजरीवाल यांना मद्य धोरण गैरव्यवहारप्रकरणी सीबीआयने चौकशीला बोलावल्यामुळे भाजपच्या शेकडो कार्यकर्त्यांनी विधानसभेसमोर निदर्शने केली. केजरीवाल यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात आली.

### माकन यांच्या मताची चर्चा

**» दुसरीकडे काँग्रेसचे नेते अजय माकन हा गैरव्यवहार खूप मोठा असल्याने यांनी काँग्रेसने केजरीवाल यांच्या पाठीशी उभे राहू नये, अशी प्रतिक्रिया दिली आहे. यावर माकन यांचे ते खासगी मत असल्याचे काँग्रेसतर्फे स्पष्ट करण्यात आले. ‘आप’चे खासदार संजय सिंह यांनी माकन काँग्रेसमध्ये असले तरी ते भाजपच्या जवळ असल्याची टीका केली.**

---

# शाळांमधील ५०५ शिक्षक ‘डेंजर झोन’मध्ये!

## जिल्ह्यातील 15,169 विद्यार्थ्यांकडे 'आधार'च नाही; विद्यार्थ्यांचे काढावे लागणार आधारकार्ड

**। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**शाळांच्या संचमान्यतेसाठी आता आधारकार्ड असलेले विद्यार्थीच गृहीत धरले जाणार आहेत. जेवढे आधारकार्ड नसतील, तेवढे शिक्षक अतिरिक्त होणार आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील शाळा-महाविद्यालयांना (पहिली ते बारावी) १५ दिवसांत तब्बल १५ हजार १६९ विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढून घ्यावे लागणार आहे. नाहीतर जिल्ह्यातील ५०५ शिक्षक अतिरिक्त होऊ शकतात, असा इशारा प्राथमिक शिक्षण विभागाने दिला आहे.**

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या दोन हजार ७९५ शाळा असून माध्यमिकच्या एक हजार ६३ शाळा आहेत. खासगी प्राथमिकच्या देखील काही शाळा आहेत. या शाळांमध्ये साडेपाच लाखांवर विद्यार्थी आहेत. परंतु, आता २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील संचमान्यतेसाठी प्रत्येक विद्यार्थ्याचे आधार नोंदणी बंधनकारक आहे. चिंतेची बाब म्हणजे जिल्ह्यातील दीड लाख विद्यार्थ्यांच्या ‘आधार’मध्ये त्रुटी आहेत. त्यातील १५ हजार १६९ विद्यार्थ्यांचे आधारकार्डच नाही.

दुसरीकडे सव्वालाख विद्यार्थ्यांच्या आधारकार्डमध्ये लिंग, नाव, जन्मतारीखेत त्रुटी आहेत. ३० एप्रिलपर्यंत आधारकार्ड देखील काढून घ्यावे लागणार आहे आणि त्रुटींची पूर्तता देखील करून घ्यावी लागणार आहे.

मे महिन्यात सर्वच शाळांची संचमान्यता होणार आहे. त्यावेळी जेवढे आधारकार्ड नसलेले विद्यार्थी असतील, ते ग्राह्य धरले जाणार नाही. त्यामुळे तेवढे शिक्षक अतिरिक्त होणार आहेत.

**नऊ हजारांवर विद्यार्थ्यांचे लिंग, जन्मतारीख चुकली**

जिल्हा परिषदेच्या दोन हजार ७९५ शाळांमधील सहा हजार १४७ विद्यार्थ्यांकडे अजूनही आधारकार्डच नाही. तर ३० हजार विद्यार्थ्यांच्या आधारमध्ये त्रुटी आहेत. त्यात नाव, जन्मतारीख, लिंग, जन्मतारीख व लिंग, नाव व जन्मतारीख आणि नाव व लिंगात बदल झालेला आहे. खासगी प्राथमिक शाळांमधील (पहिली ते आठवी) सहा हजार ४३२ विद्यार्थ्यांचे आधारकार्ड शाळांमध्ये नोंदवलेलेच नाही. तर नववी ते बारावीच्या वर्गातील दोन हजार ५९० विद्यार्थी आधाराविनाच आहेत. ३० एप्रिलपर्यंत त्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढून त्याची ‘सरल’ पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक आहे.

### मुलांची ‘आधार’ची स्थिती (इयत्ता 1 ते 12)

- **एका शिक्षकासाठी विद्यार्थी** ३०
- **मुलांचे ‘आधार’च नाही** १५,१६९
- **‘अतिरिक्त’ची भीती** ५०५
- **Aआधार प्रमाणीकरणाची मुदत** ३० एप्रिल

### संचमान्येपूर्वी आधार बंधनकारकच

» झेडपी शाळांबरोबरच खासगी प्राथमिक व माध्यमिक शाळा-महाविद्यालयांमधील एकूण १५ हजार विद्यार्थ्यांचे आधारकार्ड नोंदवलेले नाही. दुसरीकडे मिसमॅच असलेले देखील विद्यार्थी लाखांवर आहेत. दोन्हीची पूर्तता ३० एप्रिलपर्यंत करावे लागणार आहे. सीईओ दिलीप स्वामी यांनी मुख्याध्यापकांना त्यासंदर्भात वेळावेळी मार्गदर्शन केले आहे. पंचायत समित्यांसह महिला व बालकल्याण विभागाकडील आधार केंद्रांवरून शाळांनी आधारकार्ड काढणे व त्रुटींची दुरुस्ती करून घ्यावी.



# लग्नासाठी कसा मुलगा हवा? समृद्धी केळकरने वाचला अटींचा पाढा

समृद्धी केळकर ही छोट्या पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री आहे. स्टार प्रवाहवरील 'फुलाला सुगंध मातीचा' मालिकेतून समृद्धी घराघरात पोहोचली. या मालिकेत तिने किर्ती ही व्यक्तिरेखा साकारली होती. समृद्धीची 'दोन कटिंग' ही वेब फिल्मही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरली होती. या वेब फिल्ममध्ये समृद्धी व अक्षय केळकर मुख्य भूमिकेत होते. 'दोन कटिंग'चा सिक्वेल लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या वेब फिल्मचा तिसरा भाग अक्षय्य तृतीयेच्या मुहुर्तावर प्रदर्शित होणार आहे. 'दोन कटिंग ३'च्या निमित्ताने समृद्धी व अक्षयने रोडिओ मिरचीला मुलाखत दिली. या मुलाखतीत समृद्धीला लग्नाबाबत प्रश्न विचारण्यात आला.

लग्नासाठी कसा मुलगा हवाय? असा प्रश्न तिला विचारला गेला. या प्रश्नाचं उत्तर देताना समृद्धीने तिच्या अपेक्षांचा पाढाच वाचला.समृद्धीच्या या उत्तरावर अक्षय म्हणाला, "आता मुलांनी त्यांच्याकडे असलेल्या कुत्र्याबरोबर फोटो पाठवा." यानंतर मुलाखतीत एकच हशा पिकला. समृद्धीने लग्नासाठी मुलाकडून असलेल्या आणखी एक-दोन अपेक्षा सांगितल्या. "मुलाला कलेची जाण असली पाहिजे. सांस्कृतिक कार्यक्रम, डान्स व गाण्याचे कार्यक्रम हे एन्जॉय करता आलं पाहिजे. मी काय करते, कोणत्या क्षेत्रात काम करते, हे तरी त्याला माहीत असावं," असंही पुढे समृद्धीने सांगितलं. 'फुलाला सुगंध मातीचा' मालिकेतून लोकप्रियता मिळवलेली समृद्धी सोशल मीडियावरही प्रचंड सक्रिय असल्याचं पाहायला मिळतं. सध्या समृद्धी 'मी होणार सुपरस्टार जल्लोष ज्युनिअर्स'चा या शोचं सूत्रसंचालन करत आहे.



# रणबीरनं आलियाला दिलं 'इतक्या' लाखांचं गिफ्ट!

बॉलिवूडचे स्टार कपल आलिया आणि रणबीर कपुर हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. नुकताच या जोडप्याने त्याच्या लग्नाचा पहिला वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा केला.
अनेक कलाकरांनीही त्यांच यानिमित्त अभिनंदन केले आहे. त्यादिवशी आलिया आणि रणबीर त्याच्या नव्या घराच्या बांधकाम सुरु असलेल्या जागी स्पॉट झाले. त्यानंतर त्यांनी पापाराझींना पोजही दिली. मात्र यावेळी त्यांनी कॅमेऱ्यासमोर एकमेंकाना किस केल्याने त्यांना ट्रोल केले गेल होतं. ज्याची सोशल मिडियावर बरिच चर्चा रंगली.मात्र आता सोशल मिडियावर आणखी दुसऱ्या गोष्टीची चर्चा रंगली आहे. लग्नाच्या पहिल्या



वाढदिवसानिमित्त रणबीर पत्नी आलियासोबत एक दिवसासाठी मुंबईत परतला. विशेष म्हणजे, रणबीरचा एअरपोर्ट व्हिडिओ इंटरनेटवर व्हायरल झाला आहे, ज्यामध्ये तो पिंक चॅनेल स्लिंग बॅग घेऊन जाताना दिसला. मुंबईला परतताना रणबीर कपूर हातात बॅग घेऊन दिसला.त्याने आलिया भट्टसाठी लंडनमधून चॅनेल बॅग खरेदी केली होती. त्यानंतर आलिया आणि रणबीर त्यांच्या नवीन घराच्या बांधकाम साइटला भेट देताना दिसले आणि आलियाने तीच गुलाबी चॅनेल स्लिंग बॅग घेतली.या बॅगची किंमत सुमारे 10 लाख रुपये आहे. रणबीरने विमानतळाचा व्हिडीओ शेअर केल्यानंतर लगेचच चाहत्यांनी या गिफ्ट बद्दल अंदाज लावला. त्यानंतर सोशल मिडियावर पुन्हा आलिया आणि रणबीरची चर्चा रंगली.दरम्यान लग्नाच्या वाढदिवसानिमित्त आलियाने तिच्या लग्नातील काही अनसीन फोटो शेअर केले ज्यात आफ्रिकेत रणबीर तिला प्रपोज केल्याचा आणि त्याच्या हळदीच फोटो दिसले. चाहत्यांनी

# देसी गर्ल प्रियांका चोप्राला करायची आहे 'या' गोष्टीची तस्करी



बॉलिवूडची देसी गर्ल आणि आता हॉलिवूड स्टार प्रियांका चोप्रा सोशल मीडियावर चांगलीच सक्रिय असते. प्रियांका तिच्या वैयत्तिक आयुष्याशी संबंधित गोष्टी तिच्या चाहत्यांसह शेअर करताना दिसते. पुन्हा एकदा देसी गर्ल तिच्या इन्स्टाग्राम पोस्टमुळे चर्चेत आली आहे. या पोस्टमध्ये प्रियांकाने एका विशिष्ट गोष्टीच्या तस्करीबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. प्रियांकाची ही पोस्ट चांगलीच व्हायरल होत आहे. सध्या मे महिना सुरू असल्याने प्रत्येकाला आब्याचे वेध लागले आहेत. याचसंदर्भात प्रियंका चोप्राने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर एक व्हिडिओ आणि एक फोटो शेअर केला आहे. त्यात अभिनेत्री तिच्या लंडनच्या घरी शांतपणे बसून आंब्याचा मनसोक्त आस्वाद घेताना दिसत आहे. इंस्टा स्टोरीवर शेअर केलेल्या फोटोमध्ये प्रियांका बाथरोब परिधान केला आहे. फोटोमध्ये प्रियांकाच्या हातात एक प्लेट आहे, ज्यामध्ये कापलेले आंबे ठेवले आहेत अन् प्रियांका आंब्याचा मनसोक्त आस्वाद घेत आहे. या फोटोशिवाय प्रियांकाने एक बूमरँग व्हिडिओही शेअर केला आहे. त्यात पासपोर्टबरोबर एक आंबा ठेवलेला दिसतो आहे. या फोटोवर प्रियांकाने मस्करीत लिहिले आहे, की "आंब्याची तस्करी कायदेशीर आहे का? मी हे एका मित्रासाठी विचारत आहे." प्रियांकाची ही इन्स्टा स्टोरी पाहून ती आंबा प्रेमी असल्याचे स्पष्ट झाले आहे. तिचे हे फोटोज चाहत्यांना प्रचंड आवडले आहेत, बऱ्याच लोकांनी प्रियांकाचे कौतुकही केले आहे. सध्या प्रियांका तिच्या आगामी 'सिटाडेल' या वेबसीरिजमुळे व्यस्त आहे. या ॲक्शन-थ्रिलरमध्ये ती रिचर्ड मॅडनसह मुख्य भूमिकेत दिसणार आहे. ही वेबसीरिज २८ एप्रिल २०२३ रोजी ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे.

# जेनिफर विगेंट करणार बॉलिवूडमध्ये पदार्पण



कार्तिक आर्यनसोबत जेनिफर विगेंटला अप्रोच करण्यात आलेलं आहे. मात्र अजून याबाबत कोणता खुलासा झालेला नाही. परंतु ही बातमी खरी झाली तर टेलिव्हिजनवरील ही सुंदर अभिनेत्री बॉलिवूडच्या सिलव्हर स्क्रीनवर दिसेलहिंदी टेलिव्हिजनवरील अभिनेत्री जेनिफर विगेंट आता टेलिव्हिजननंतर बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्याचा विचार करत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार जेनिफर विगेंटला बॉलिवूड अभिनेता कार्तिक आर्यनसोबत चित्रपटामध्ये दिसणार आहे. मात्र अजून याबाबत कोणताही खुलासा झालेला नाही परंतु ही बातमी ऐकूण जेनिफर विगेंटचे चाहते खूप खूश झाले आहेत. मीडिया रिपोर्ट्सच्या माहितीनुसार कार्तिक आर्यनसोबत जेनिफर विगेंटला अप्रोच करण्यात आलेलं आहे. मात्र अजून याबाबत कोणता खुलासा झालेला नाही.

# चेल्यावर गुरु पडला भारी!

## » चेन्नईचा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूवर आठ धावांनी सुपर विजय

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**साऊथ डर्बीमध्ये आजचा सामना बंगळुरूमध्ये एम. चिन्नास्वामी सुरु आहे. आयपीएलच्या २४व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध संपन्न झाला. दोन्ही संघ सोमवारी (१७ एप्रिल) बेंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर आमनेसामने होते. आरसीबीचा कर्णधार फाफ डुप्लेसिसने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. धोनीच्या चेन्नईने बंगळूरूवर आठ धावांनी रोमांचक विजय मिळवला. आरसीबीचा कर्णधार फाफ डुप्लेसिसने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. चेन्नईने २० षटकांत ६ बाद २२६ धावा केल्या. प्रत्युत्तरात आरसीबीचा संघ २० षटकांत आठ गडी गमावून २१८ धावाच करू शकला.**

चेन्नई सुपर किंग्जने रोमहर्षक सामन्यात आरसीबीचा आठ धावांनी पराभव केला. त्याचा हा मोसमातील तिसरा विजय आहे. चेन्नईचे आता पाच सामन्यांत सहा गुण झाले आहेत. त्याचवेळी आरसीबीचा हा तिसरा पराभव आहे. त्यात फक्त चार अंक आहेत. चेन्नईने गुणतालिकेत तिसरे स्थान पटकावले आहे. त्याचवेळी



आरसीबी सातव्या स्थानावर आहे. शेवटच्या षटकात आरसीबीला विजयासाठी १९ धावांची गरज होती. सुयश प्रभुदेसाई आणि वनिंदू हसरंगा संघाला विजय मिळवून देऊ शकले नाहीत. प्रभुदेसाईने षटकार मारून आशा उंचावल्या पण हसरंगाच्या साथीने तो फक्त १० धावाच जोडू शकला. प्रभुदेसाईही शेवटच्या चेंडूवर बाद झाला.

चार विकेट पडल्यानंतर दिनेश कार्तिक आणि शाहबाज अहमद यांनी आघाडी घेतली. कार्तिकने १४ चेंडूत २८ धावा झटपट काढल्या. त्याचवेळी शाहबाज अहमद १० चेंडूत १२ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. शेवटच्या षटकात सुयश प्रभुदेसाईने ११ चेंडूत १९ धावा केल्या, पण तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. चेन्नईकडून तुषार देशपांडेने तीन आणि मथिशा पाथिरानाने दोन गडी बाद केले. आकाश सिंग, महिष तेक्षाना आणि मोईन अली यांना प्रत्येकी एक यश मिळाले.

### विराटची बॅट चालली नाही

» पहिल्याच षटकात चेन्नईचा प्रभावशाली खेळाडू आकाश सिंगने आरसीबीला मोठा धक्का दिला. त्याने विराट कोहलीला (४) क्लीन बोल्ड केले. कोहलीच्या पाठोपाठ महिपाल लोमरोर (०)ही धावला नाही. दुसऱ्याच षटकात तो तुषार देशपांडेचा बळी ठरला. आरसीबीचा कर्णधार फाफ डुप्लेसिस आणि अष्टपैलू ग्लेन मॅक्सवेल यांनी १५ धावांत दोन गडी बाद झाल्यानंतर झटपट धावा केल्या. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी १२६ धावांची भागीदारी केली. मॅक्सवेल ३६ चेंडूत ७६ धावा करून बाद झाला. त्याने आपल्या खेळीत तीन चौकार आणि आठ षटकार मारले. फॅफ डुप्लेसिस ३३ चेंडूत ६२ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. त्याने पाच चौकार आणि चार षटकार मारले. डुप्लेसिस बाद झाला तेव्हा आरसीबीची धावसंख्या १४ षटकांत १५९ होती. येथून संघाला विजयासाठी सहा षटकांत ६८ धावा करायच्या होत्या.

तत्पूर्वी, चेन्नई सुपर किंग्जने आरसीबीला २२७ धावांचे मोठे लक्ष्य दिले होते. त्याने २० षटकांत ६ गडी बाद २२६ धावा केल्या होते. चेन्नईसाठी डेव्हॉन कॉनवे आणि शिवम दुबे यांनी स्फोटक अर्धशतके ठोकली. कॉनवेने ४५ चेंडूत ८३ तर शिवम दुबेने २७ चेंडूत ५२ धावा केल्या. अजिंक्य रहाणेने २० चेंडूत ३७ धावा केल्या. मोईन अली नऊ चेंडूत १९ धावा करून नाबाद राहिला.

---

# पुन्हा एकदा रिंकू सिंगने जिंकली मनं!

## » मैदानाबाहेर केली शानदार कामगिरी, गरजूंना दिला मदतीचा हात

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**काही करुन दाखवण्याची हिंमत असेल तर गरिबीने काही फरक पडत नाही. मेहनतीच्या जोरावर एक दिवस यश आणि प्रसिद्धी मिळते. ही गोष्ट आयपीएल २०२३ चा सिक्सर किंग रिंकू सिंगने हे सिद्ध करुन दाखवले. वास्तविक, अलिगढच्या रिंकू सिंगने कोलकाता नाईट रायडर्सकडून खेळताना गुजरात टायटन्सविरुद्ध ५ चेंडूत सलग ५ षटकार ठोकून केलेल्या अप्रतिम पराक्रमाची सर्वांनाच कल्पना आहे. आता तो गरीब मुलांना प्रशिक्षण देण्यासाठी अलीगढमध्ये वसतिगृह बांधत आहे. अलिगडमधील महुआ खेडा स्टेडियममध्ये हे वसतिगृह बांधले जात आहे.**

रिंकूच्या भावाच्या म्हणण्यानुसार, हे १०० खाटांचे वसतिगृह लवकरच तयार होईल. रिंकू सिंगचा मोठा भाऊ मुकुल सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, या वसतिगृहात सुमारे १०० विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. गरिबीमुळे मागे राहिलेल्या प्रतिभावान मुलांना या वसतिगृहात राहण्यासोबतच क्रिकेटचे प्रशिक्षणही मिळावे, हा रिंकू सिंगचा उद्देश आहे.

गरीब मुलांच्या वेदना तो समजू शकतो. या कारणास्तव, त्याला गरीब मुलांना प्रशिक्षण देऊन क्रिकेटच्या जगात आपल्या स्थानावर आणायचे आहे. सुमारे १०० मुलांसाठी हे वसतिगृह तयार करण्यात आले



आहे. वसतिगृहातील मुलांना प्रशिक्षणासोबतच सर्व सुविधा मोफत दिल्या जाणार आहेत. तसेच आता गरिबी कोणत्याही होतकरू मुलाचा मार्ग रोखणार नाही, असेही सांगितले.

अलिगढ येथील रिंकूचे बालपणीचे प्रशिक्षक मसुदज-जफर अमिनी म्हणाले, “त्याला नेहमीच तरुण खेळाडूंसाठी वसतिगृह बांधायचे होते. ज्यांच्याकडे त्यांच्या स्वप्नांचा पाठपुरावा करण्यासाठी आर्थिक संसाधने नाहीत. रिंकू आता आर्थिकदृष्ट्या भक्कम असल्याने, त्याने आपले स्वप्न प्रत्यक्षात आणण्याचे ठरवले आहे.

### रिंकू सिंग स्वत: क्रिकेटचे धडे शिकवणार

» मुकुल सिंग म्हणाले की, रिंकू सिंग अशा गरीब मुलांसाठी वसतिगृह बांधत आहे, ज्यांना क्रिकेटमध्ये त्यांचे भविष्य घडवायचे आहे. परंतु त्यांच्या मार्गात गरिबी येत आहे. एवढेच नाही तर गरीब मुलांना स्वत: रिंकू सिंग प्रशिक्षण देणार आहे. सुमारे एक ते दीड महिन्यात या वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण होणार आहे. माझ्या भावाने गरिबी सहन केली आहे, असेही सांगितले.

### वसतिगृहात सर्व सुविधा मोफत उपलब्ध असणार

» प्रशिक्षक पुढे म्हणाले, “तीन महिन्यांपूर्वी रिंकूने त्याच्या संघात सामील होण्यापूर्वी प्रगतीकडे बारकाईने लक्ष ठेवून काम सुरू केले. वसतिगृहात १४ खोल्या असतील आणि प्रत्येकामध्ये चार प्रशिक्षणार्थी राहू शकतील. शेड आणि मंडपही बांधला जात आहे. स्वतंत्र स्वच्छतागृहे आहेत. देखील बांधले जात आहे. हे प्रशिक्षणार्थीसाठी त्या ठिकाणी चालवल्या जाणाऱ्या कॅन्टीनमध्ये जेवण सोय असणार असणार आहे. यासाठी सुमारे ५० लाख रुपये खर्च येणार असून संपूर्ण खर्च रिंकू करणार आहे.